मा.प्र.वि.
मध्यवर्ती नोंदणी कक्ष (CRU) संगणक क्रमांक
e-3271702
नोंदणी कर्मचारी | नियंत्रण अधिकारी, मध्यवर्ती नोंदणी कक्ष

विभागीय आयुक्त कार्यालय
अमरावती
07 NOV 2024
013200
लिपीक.................

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : जीईएन(विस)-२०२४/प्र.क्र.३६/२४/३३ निवडणूक (१)
सामान्य प्रशासन विभाग,
कक्ष क्र .६११, ६वा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -३२.
दिनांक :०६ नोव्हेंबर, २०२४.

प्रति,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
२. विभागीय आयुक्त, सर्व.
३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
४. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता)
५. १६- नांदेड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
६. (जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांच्यामार्फत) अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
७. विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व. (जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत)

**विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४- टपाली मतपत्रिकांचे आदानप्रदान तसेच विभागीय समन्वय केंद्र स्थापन करण्याबाबत..**

महोदय/महोदया,

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने टपाली मतपत्रिकांचे आदानप्रदान करण्याकरिता राज्य समन्वय केंद्र,औरंगाबाद येथे सर्व जिल्ह्यांची पहिली भेट दिनांक ९.११.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सदर भेटीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

- राज्य समन्वय केंद्र भेटी दरम्यान भारत निवडणूक आयोगाने दि. ३१.१०.२०२३ रोजीच्या पत्रामधील परिच्छेद क्र.८ मध्ये नमुद केलेल्या निदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपात्रिका, आवश्यक नमुने व लिफाफ्यांसह तसेच इतर सामग्रीसह मतदारांची यादी तयार करुन समन्वय केंद्राद्वारे टपाली मतपत्रिकांसाठी नियुक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.
- याकरिता, भारत निवडणूक आयोगाने दि. ३१.१०.२०२३ रोजीच्या पत्रामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमुद केलेल्या सुचनेनुसार टपाली मतपत्रिकांचा संच करुन संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदारांच्या यादीसह टपाली मतपत्रिकांसाठी नियुक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/समन्वय अधिकारी यांना हस्तांतरीत करण्यात यावा.
- टपाली मतपत्रिकांचा संच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना हस्तांतरीत करताना काउंटर फॉईलचे हस्तांतरण करण्यात येवू नये. (Counter Foils Dispatching RO च्या ताब्यात राहतील)
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वैध ठरविलेल्या निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांची (Polling staff, Police staff, Essential service staff ) यादी तयार करण्यात यावी. सदर यादी संबंधित मतदारसंघाच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/समन्वय अधिकारी यांना हस्तांतरीत करण्यात यावी. सदर यादी मध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांकानुसार टपाली मतपत्रिका Facilation centre वर वितरित करण्यात याव्यात.

C:\Users\Sachin Satose\Desktop\...\Postal Ballot\Letters of Postal Ballot Papers.docx